# झक झक



## विजय खाडिलकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# रुकरुक

कथासंग्रह

## विजय खाडिलकर

# रुकरुक

कथासंग्रह

लेखक: विजय खाडिलकर

1403, माझगांव टोवर्स, म्हातारपाखाडी, माझगांव, मुंबई 400010

दूरध्वनि: 23776889, मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

इ मेल vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ८ एप्रिल २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १२०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- विजय खाडिलकर - ९८२१२२२०४२

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री विजय खाडिलकर



कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना "खिडक्या" व "धर्म" या कथासंग्रहांचे लेखक आणि वास्तुपुरुष आणि मोर्चा या नाटकांचे नाटककार म्हणून ओळखतात. त्यांच्या चारही ई पुस्तकांना वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे पाचवे पुस्तक. तिसरा कथासंग्रह.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह व नाटक असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. खिडक्या, लालबत्ती, सरसरती सर. परिक्रमा: हे कथासंग्रह व वसंतचाहूल हा कवितासंग्रह, पारंब्या..ही कोमसाप स्पर्धेत तृतिय पारितोषिक पात्र कादंबरी. या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते, त्याचबरोबर त्याहून वेगळं लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

पात्रांच्या मागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा पूल असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

विजय खाडिलकरांचं हे ई पुस्तक तुम्हाला कसं वाटलं ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद

सुनीळ सामंत, टीम ई साहित्य

# अर्पण पत्रिका

दुर्मिळ होत चाललेल्या

माणूसपणाला समर्पित

# कथानुक्रम


भांडण

मुन्नू

रुकरुक

## ** भांडण **

'काय ठोकायली ग माह्या डुईवर' सीताबायनी आपल्या बोळकंडीसारख्या दारातनं बाहेर येत हातातलं आल्मिनचं भगुणं दारातल्या पाण्याच्या टिपावर ठेवलं नि बाजूच्या शिडीच्या दोन पायऱ्या चढून वरच्या भागातल्या जनाबाईला हटकलं.

वर कोबा असला तरी फळयांच्या सांध्यामधनं खाली तिच्या घरात रेती पडायला लागली होती.

'मसाला वाटती. '

'आगं भवाने मंग खाली यून वाटाय काय झालं. माहं घर कोसळू घालती का काय तरी. '

'कोसळंल कसं? मातीचं हाय का? आनि झालंच काय तर तुह्याकडं डिपासिटाचं पैसं हायतंच कि. '

'लई रूबाब नगं दावू तुह्या पैशाचा. डिपासिट तर ह्या टेलरनंबी भरलंय्. त्यो ऱ्हातोय का नै? तेबी मह्या फुडल्या अर्ध्या जागत. तू तर फाटीफुडं अख्खा कमरा वापरती..’

'मंग भाडंबी तसंच घेती कां नाय? त्यो टेलर यवडी गिऱ्हाइकी करतोय तरी हजारच घेतोय पर माह्या दादल्याकडनं डबल घेती का नाय्. तेबी पावसापान्याचं गळतंय तरी.'

'मंग काय तुह्या डुईवर छाता धराय यऊ काय ग भवाने? '

'आगं बये पत्रं बदलाय व्हतंय् का न्हाई? मह्या टिव्हीवर पानी पल्डं तर देशीन का भरून? ’

'लई रूबाब सांगायली टिव्हीचा. येतंय् कोन तुह्याकडं? '

'तुही लेक येती का नाय इचार, तू कामाला गेल्यावं.'

‘तुह्या पोराला खेळवती का नाय मंग? आन् त्येबी खेळतंय् तिच्यासंगट तं तू का जळाय् लागली?’

‘म्हूनच सांगती का पत्रं बदल पावसाआदुगर. न्हायतं पोरीला लावून दिन माघारी.’

' मंग दे लावून. तिलाबी बघती मी पर तुहा ह्यो कारखाना थांबवती का नाय्. '

एवढयात सीताबायचा ओरडा ऐकून तिच्या पार्टीशनपलिकडे टेलरिंगचं काम करून भरपूर पैसे कमवणारा जुम्मनही रेती पडते म्हणून बघायला बाहेर आला.

'अरे बंद कर वो तेरा मसाला पिसना. मेरा गिऱ्हाकका कपडा खराब होंगा तो तुम भरके देंगा क्या? और तूबी सिताबाय, कैसा भाडूत रख्खा है. '

झोपडीच्या वरच्या भागाला लावलेल्या शिडीच्या तोंडाशी येत मग जनाबाई टेलरला बोलली ;

'तेरे मूँ नही लगना मेरेको. मेरा आदमी आएगा तब बात करना. आन् तूबी सिताबाय ,उगा कटकट करू नगं. काय कोसळत नाय् तुहं घर. हाय तं पोट्रस्टच्या जागंत. कवा यिल कोन आन पाडून टाकल तं समदंच कचऱ्यात जाईन.’

'आस्सं? तू तं लई शानी व्हऊन राहयली माही बाय्. कुडं जागा भेटना झाली तवा माहेच पाय धरायले आल्ता तुहा दादला. आता बघंतीच, तू पैप कसा लावती त्ये. पानीच नाय् भेटलं तं काय करशीन् गं मंग भवाने?'

'त्येबी फुकट द्यायली का काय? तेचंबी मोजून दाम घेतीसच कि. मुन्शिपाल्टीवाला आला तं काय व्हईन? पोट्रस्टची जागा न् मुन्शिपाल्टीच्या पायपाला पंप लावून पानी खेचतीयास. काय नगं दाकवू मालकिनीचा तोरा.'

'आता तू वाटायचं थांबवती का नाय?' निरूत्तर झाल्यामुळे सीताबाय शिडीवरनं खाली उतरली. तशी शिडीच्या टोकावर दाराशी आलेली जना आणखीच तावातावाने बोलायला लागली. तो कालवा ऐकून आजूबाजूच्या दारात कामं करणाऱ्या बाया बघायला लागल्या. तशीच दोन घरं सोडून पुढे असलेल्या झोपडीच्या वरच्या दारातनं कौसर डोकावून, खाली तिच्या शिडीजवळ ठेवलेल्या टिपाशी उभी राहून भांडण ऐकणाऱ्या लैलाला विचारायला लागली.

'अरी लैला, मेरा सामान किदर रक्खा तूने? '

'होगा उदरीच. आपाको पूछ.' भांडण ऐकण्यात रंगलेल्या लैलाने फारसं लक्ष दिलं नाही.

इतक्यात लैलाच्या बाजूने आपला पत्रयाचा ढोल घेऊन गल्लीबाहेर जाणारा बुटका चंदर कौसरकडे बघून जोरात हंसला. ती 'सामान' म्हणाली म्हणून असेल असं तिला वाटलं. म्हणून त्याच्याकडे रागाने पहात मग कौसर बोलली,

'तेरेकू दात दिखानेको क्या हो गया? जा अपना ढोल बजा जाके.'

‘चंद्रूभैय्या किदर जाता आज तुम बजानेको?’

‘है एक सुपारी.’

‘शादीका वास्ते?’

‘नै रे. पूजा है किसीका घर.’

‘ओ लैला , तू अपना कपडे धोनेका काम कर. फोकटकी दुनियादारी कायको मंगता तेरेकू? और ये बुट्क्याको तूने राखी बांधी थी क्या भाई बोलके?’

‘अरे हम मुन्शिपाल्टीका स्कूलमे एकसाथ आते जाते तो थे.’

‘लेकिन अब तो बंद हो गया ना. वो कहाँ पढनेवाला था? बास फिर.’

कौसर आत गेली. जुम्मन टेलरने तिला शराऱ्याच्या एम्ब्रॉयडरीचं काम दिलं होतं ते पुरं करायचं होतं.

तिला जुम्मन त्या काळयाढुस्स् सीताबाईकडे रहातो म्हणून आवडायचा नाही. पण काम तिच्या आवडीचं नि पैसेही बरे द्यायचा. अब्बा तर काम न करता नुसत्या बिडया फुकत गप्पा मारत बसतो नाक्यावरच्या फेरीवाल्यांजवळ.त्याला स्वत:ला फेरीचा धंदा करायला कमीपणा वाटतो. अम्मी बिचारी रेल्वेलाईनच्या पलिकडे, लांबच्या सोसायटीत बोहऱ्याकडे जेवण बनवायला जाते ते पैसे पुरत नाहीत. म्हणून तर लैलाला शाळेतून काढलं. लैलाला बहिण मानलं तरी चंदरची कौसरवर लाईन होती, स्वत: तिच्याहून लहान आणि बुटका असूनही! लैला बिचारी शिडीजवळ कपडे धूत बसायची, अशीच कोणाची तरी भांडणं ऐकत. नाहीतर आल्यागेल्याशी बोलत...

हे दुसरं भांडण संपलं तर तिकडे तिसरं पुन्हा सुरू झालं.

पैसे मिळतात म्हणून शाळा सोडून ढोल वाजवायला जाणारा चंदर तसा वयाने लहानच होता. मोठा भाऊ कारशेडमधे वॅगनमधला माल उतरवायला कॉन्ट्रेक्टरकडे जायचा नि आई क्वार्टरमधे घरकामाला. तिला मदत म्हणून नि गुटख्याची चटक भागवायसाठी तो ही सुपारी घ्यायचा. तो आपला ढोल संभाळत जाताना गल्लीत शिरणारा बंगाली मच्छीवाला मन्सूर त्याला धडकला.

‘तेरेकू दिखता नै क्या?’

‘दिखता तब्बीच बचाया. नैतो बाजूका नालीमे गिरता तुम. है तो रत्तीभरका. जुबान चलाता.’

बंगाली मासेवाला जरा जोरातच बोलला.

त्याला हा बांगलादेशी मासेवाला नेहमी ‘रत्तीभरका’ नाही तर ‘घुटनेभरका’ असं खिजवायचा. तो बुटका होता म्हणून. गळयातला ढोल जोरजोरात बडवणारा बुटका चंदर दिसायचाही मजेशीरच. त्याच्यावर रागाने गुरगुरत मग चंदर गल्लीबाहेर पडला.

आपल्या वर घेतलेल्या चौकडीच्या लुंगीची अर्ध्यावर गांठ मारलेली, अर्धवट वाढलेली दाढी नि डोक्यावरच्या पत्र्यामधून मच्छीच्या पाटीतलं पाणी अंगावर सांडून भिजलेला नि घामेजलेला शर्ट अशा अवतारातला मन्सूर गल्लीच्या वरच्या अंगाला राह्यचा. पाठीमागच्या वर्कशॉपच्या भिंतीला लागूनच त्याने पत्र्याची शेड बांधली होती. त्याच्या परतीच्या वाटेकडे डोळे लावून वाटण करून त्याची वाटच पहात असलेली जना त्याचा आवाज ऐकून

वर शिडीच्या टोकाशी आली. दाराला फळी लावून पोराला उभं करीत खाली आली.

'रूकना भैय्या. मेरेकू मच्छी मंगता ना.'

'तुमको बोला हमको भैय्या मत बोलो..हम भैय्या नही, बांग्लादेशका है.'

'लेकिन तेरी बिब्बी तो इदरकीच है ना. चालीके कोनेमे खडी तुम्हारा रास्ता देखती होगी.'

'वो किदर घरमे होगी? गई होगी बकरेके वास्ते पत्ता लानेको.'

'अरे वो तो कब्बी आई है दर्याके बाजूसे पत्तेका गठरी लेके. साथमे वो खेकडाबी लाई होगी.' मधून मधून माळयावर असलेल्या आपल्या घराच्या खिडकीवजा दारातून डोकावून सगळयांवर नजर ठेवणारी फरानाभाभी वरूनच बोलली.

'हां. उसको वहीच एक काम है.' पाटी घेऊन जनासाठी थांबलेला मच्छीवाला बोलला.

'अच्छाही तो करती. बकरीईद सरपर है. तेरे बकरेका अच्छा पैसा मिलेंगा.'

'क्या मालूम. अब्बी तो वो पत्ता बेचनेको ले जाएगी शिवडीमे. उदर बकरेवाले लेतेच ना.'

'उसकाबी तो पैसा मिलेगा ना.'

ह्या सगळयात रस नसल्यामुळे खोळंबून राह्यलेली जना मग बोलली.

'वो सब छोडो तुम लोग. मेरेवास्ते कुछ है क्या बोलो.'

'थोडा मांदेली बचा है. सुभासे फेरी किया कोलनीमे. सब खतम हुआ.'

असं म्हणत तो पाटी उतरवणार तो सीताबाईने आपल्या दारातला भांडयाचा पसारा मुद्दामच विखरून ठेवला, जनीबद्दलचा राग काढायसाठी. मासेवाल्याने मग पाटी हातातच धरली. ते बघून मासे पहातानाच समोरून गल्लीत शिरणाऱ्या शेवताबाईला मुद्दाम थांबवून जनी बोलली,

'घेती का शेवताबाय् मच्छी?'

'हा. पैशे तू देती का? खा बाई तूच. तुहा दाल्ला रोजावर जातोय.'

'हा बाय. तवाच लोकं जळत्यात. आमी का खाऊने वशाटतिखाट?'

हे ऐकून तोंडातल्या तंबाखूची पिचकारी नालीत टाकून सीताबाय बोलली,

'आपल्याला काम भेटलं तर खानार का नाय शेवते? उगा दाल्ल्याच्या जीवावर उडया. पर तू का गं लवकर आली? आज काम भेटलं नाय का?'

'आगं, आज कंत्राटवाल्याचा मेस्त्रीच नाय आला. गेला आसंन दुसऱ्या कामावं.'

ती लादीवाल्या कॉन्टेक्टरकडे रेतीसिमेन्टच्या बिगारीकामावर रोजानी पगार घ्यायची.

'जाती ग बाय्. पोरीनं काय रांधयलं बघते. रातच्याला त्यो यील बेवडा मारून. तेची कायतरी सोय बगाय पायजेल.'

'तूबी काय मसाला करती का ग?'

'हा बाय. परवा बेवडयाला पैशे भेटले तं हानलं थोडं सामान.'

'आगं बये, तूही लेक आल्ती इचाराय मले.'

'काय म्हनं ती? '

‘म्हनं कशी, का काकी तुह्या पत्रयावं मिरच्या टाकू का वाळत.’

‘आगं मीच बोलली तिला. माहयावालं छपराचं पत्रं पार फाटून गेल्यालं. कुडं घालनार मंग? ’

‘आगं माहयावालंबी तसंच हाय. वरली शेटानी आत्ताच लागली नं भांडाय्. पावसाच्या आदीच

ताडपत्री घालाय् पडंल.’

‘मालाबी सांग मंग तू आनशीन् तवा. पर तू का नाय गेली कालनीत?’

‘नाय. आज मह्या पोरीले दिली लावून. अशीबी साळा नाय करत न अख्खा दिस टिव्ही बगाय जाती. ह्या मोठया लोकाइले लई शौक टिव्हीचा. आपल्याला आसले शौक कराय् नाय भेटत.’

हे ऐकून मासे घेऊन शिडी चढणाऱ्या जनीचं टकुरं फिरलं.

‘त्यासाटनं लेकीची भाड खाऊन पोट भरती का गं? उगा लोकांवर जळत आसती; भाडखाव.’

संतापाने हातातलं धुतलेलं आल्मिनचं भांडं जोरात आपटत मग सीताबाय जोरात ओरडली,

‘भाडखाव कोन गं रांडं. तुह्या पदराचं खाती का मी?’

‘पदरच टाकला का समदंच भेटते.’ वरती दाराशी उभी जनी जोरात बोलली. तिचा निर्देश जुम्मनकडे होता हे सीताबायला कळत होतं. नवऱ्याविना पोरीला घेऊन आईच्या खोलीत एकटीच रहाणाऱ्या सीताबायबद्दल प्रवाद होते. काळी नि नकटी असली तरी सीताबाय तब्येतीने दणदणीत नि शिवाय तशी तरूण होती. आता तर पोरही वयात येणार. लोकं बोलतंच असतात कायतरी. ती लक्ष देत नसे.

सुमार रूपाच्या सीताबाईला नवऱ्याने टाकलं होतं. पण पोर्ट ट्रस्ट कॉलनीतल्या लोकांच्या मदतीने वान्द्रयाला जाऊन तिने नवऱ्याकडनं पोटगी मिळवली होती. शिवाय वर हे भाडं होतंच. तिच्या खर्चाची सोय तिने केली होतीच. वर पोरीला झुळझुळीत कापडं घ्यायची. तिच्या मोकळया नि तोंडाळ वागण्यामुळे लोकांनी समज करून घेतले होते. जुम्मन तसा तिच्याहून लहानच होता. पण लोकांची तोंडं कोण धरणार.

पण खरं कारण वेगळंच होतं. जनीच्या नवऱ्याची बाहेर भानगड होती, तीही मुसलमानणीकडे. असं कौसरच्या अम्मीकडनं कळलं होतं. केव्हांतरी पाण्यावरच्या भांडणात सीताबायने बोलून दाखवलं होतं. म्हणून जनी तिचा रागराग करायची. तिला नेहमी धास्ती वाटायची केव्हांतरी ही बया आपल्याच नवऱ्याला नादी लावेल!

'बया बया बया ' का गं भांडान करायल्या दोगीजनी? जे ते आपल्या पदराचंच खातंय् बये. का कालवा करायल्या? जावा गुमान.' असं म्हणत शेवताबाय मच्छीवाल्याच्या मागून घराकडे निघाली.

तोच आपल्या खिडकीशी आलेली शेजारची फरानाभाभी माळयावरनंच तिला हंसत बोलली,

'तूबी क्या सुनती इनका तमाशा. थोडा टैमके बाद गले मिलेगी दोनो.'

ती मग आपले ओल्या कपडयांचे बोळे वरून पिळायला लागली. खाली कोणीच नव्हतं म्हणून.

भांडणाचा आवाज ऐकून पुन्हा दाराशी आलेला बिचारा जुम्मन त्या दोघींच्या भडीमाराने लगेच आत गेला. उगा तमाशा त्याला पसंत नव्हता. आपण नि आपलं काम ह्यातच तो खूष होता|चांगला डिझायनर असल्यासारखे

लेडिज ड्रेस शिवायचा. त्याचं दुकानवाल्यांच्या ऑर्डरींच काम खोळंबलं होतं. दोघं टेलर नुसते बसवून ठेवून भागणार नव्हतं. तो मग भरारा शरारा कट करायला लागला. गेल्या रमझानसाठी मोहल्ल्याच्या बाहेरनं पण ऑर्डरी आल्या होत्या.

सीता मग जनीकडे पहात हातवारे करत घरात गेली तरी जनी दाराशी बडबडत होतीच. बाजूच्या खिडकीवजा दरवाजातून अजून डोकावत असलेली फरानाभाभी गिड्ड्या छपराखाली धुतलेला कपडा लटकवत म्हणाली,

'अब कायको आवाज करती ग तू? वो तो अंदर गई ना अपने कामसे? बिना झगडेका एक दिन नै जाता तुम लोगांका.'

इतक्यात घरकामं करून परतणाऱ्या कौशीला बघून आत जाणाऱ्या फरानाभाभीने दारातून आपलं डोकं घारीसारखं पुन्हा बाहेर काढलं.

'इतना जल्दी कैसे आई ग तू आज? तेरा बुटक्या तो अब्बीच गया बजानेवास्ते.' फराना भाभीला मधेच मराठी बोलायची लहर यायची. मग ती नुसतंच अगं तूगं करायची. चंदर आज वाजवायला जाणार हे कौशीला माहित होतं नि थोरला तर सकाळीच बाहेर पडलेला.

'पानी कोन भरेगा बाई. मेरा तो दोनो बेटा भार. अभी तो वो बुढ्ढीने पंप बंद किया होगा.'

'वैसीच है वो. तू डर मत. नै होंगा तो मेरे टीपसे दो बाल्टी लेके जा. मेरेको तो इतना लगता नै. अपनीच बौबेटीको पानी बेचती. क्या करती पैसेका क्या मालूम.'

'अपने जवाईको पोसती फुकटमे. पासमेच रख्खा है बेटीको. उसको क्या मालूम आगे कुछ होयंगा तो बेटी कुछ कामकी नै.'

‘तूने कुछ सुना क्या? पोट्रस्टवालेके बारेमे.’

‘हां. वो संजय आके गया पिछूका मार्बलका कारखानावालेके पास.’

‘अरी, वो आया होंगा पार्टीका चंदा मांगनेवास्ते.’

‘क्या मालूम. मै चंदरको भेजी कामकेवास्ते. वो सुनके आया कि पोट्रस्टवाले झोपडा हटा देंगे, ऐसा संजय बोलता था. अब मोर्चा निकालनेका बोला.’

इतक्यात पाणी टाकायला बाहेर आलेल्या सीताबायने मोर्चा शब्द ऐकला नि एकदम कान टवकारले. तिच्या खूपच आवडीचा विषय. पार्टीवाल्यां-कडनं नाश्तापाणी , वडापाव नि वर पैसे मिळायचे. पण ते फक्त व्होटिंगसाठी हे तिला कळलं नाही. आपल्या झोपडया वाचवायसाठी संजय कशाला पैसे वाटेल.

‘कुडं चालली ग मोर्चा घ्यून?’

सीताबायचा आवाज ऐकून जनी पुन्हा वरती दाराशी आली, मच्छी साफ करता करताच.

‘मी नाय् गं बाय्. त्यो तुहा भगवा बावटावाला संजय आल्ता काल सांगाया का आपून पोट्रस्ट हापिसावर मोर्चा घ्यून जाव्या म्हनं. थोडया टायमानं यीन म्हनला.’

‘आगं, मंग ह्ये समदं आल्याआल्याच सांगावं का न्हाई? अजून जेवानबी नाय बनावलं.’

‘का गं? तू काय लगी जायाला निगाली का काय?’

‘त्ये तर मीबी जानार हाय. काल मालाबी बोलला तेचा मानूस.’ जनीने तोंड उघडलं.

खालचा संवाद ऐकत शिडीच्या वरती दाराशी आलेल्या जनीने आधीच कानोसा घेतलेला होता|

‘मंग सांगावं का नाय मान्सानं. मोर्चासाटनं कोन एकलं जातं का काय कंदी.’

मघाचं सगळं भांडण विसरून सीताबाय जनीला बोलली. तशी कौशी हंसली.

‘कां ग हंसायली तू? तू येनारच नाय् जनू.’ सीताबायला कळलं होतं कौशी का हंसली ते.

‘आगं बये, तुह्या त्या भगव्या बावटंवाल्या संजयला आमी कसं चालावं बाई. आमी निळं बावटंवालं.’

‘मंग काय झालं. पैसं तर द्याया लागलंच ना? आन् चानाश्ताबी भेटतोयच कि.’

खिडकीतनं मान बाहेर काढून फरानाभाभी कांहीच काम नसल्यासारखी ऐकायला लागली.

ती खालच्या घरात साबण बनवून हातगाडीवर विकायला नेणाऱ्या भैय्याच्या घरात भाडयाने रहात होती. तिला मोर्चाशी कांही देणंघेणं नव्हतंच. तरी सीताबायची पैसे घेऊन मोर्चात मिरवण्याची हौस तिला माहित होती. तीही हंसली नि कौशीला म्हणाली ,

‘तूबी जा गं. तेरे झंडीका रंग कोई देखता नै गं.’

तिचं ऐकून हंसत कौशी निघून गेली.

‘पानी लेने आ जा गं तू खाना खाके.’ असं म्हणत भाभीने डोकं आत घेतलं..

‘जा बाय. तुही मच्छी खराब व्हईन. लेकराले खायाला घाल आन् तयार ऱ्हाय.’

‘आन् मंग तू काय करती जेवनाचं? तूही लेकबी यीलच की कामं करून.’

‘हाय कालचं ठेवल्यालं. खाईन आपल्या हातानं घ्यून. आन् तू तयार व्हय लवकर. मी कापडं बदलती तंवर.’

‘लगी निगाय कशाला पायजेल. त्येला येऊ तं दे.’

‘मंग माही वाकळ पिळाय लाग. तुह्या कपडयाचं पानी पल्डं सकाळी वरनी. मी सांगायली असती तर भांडाय बसली आसतीस.’

मग दोघीनी मिळून सीताबायची भिजलेली जाडजूड वाकळ दोही बाजूनी धरून पुन्हा पिळली नि दारात शिडीच्या बाजूला नायलॉनच्या दोरीवर टाकली.

‘आन् माह्यावालं काम व्हईन आता. टेलरला ध्यान ठेवाय सांगती. तुह्या पोराला दे खाली लावून मह्या लेकीकडं. दोगांचाबी टाईमपास व्हईल. ती आली का मंग जायाचं व्हईन तर.’

‘कशापायी? खाली टेलर हायच कि. तुही ल्येक बसन वर टिव्ही बगायले.’

सीताबाई नुसतीच हांसली नि आत गेली.

त्या दोघींच संभाषण ऐकत असलेली फरानाभाभीही मग हंसत आत गेली|.

झालं. मोर्चाचं नांव ऐकून दोघींच भांडण मिटलं. थोडया वेळाने नकटया नाकात खोटी चमकी नि गळयात कायसं घालून भडक पातळ नेसलेली सीताबाय आपल्या बोळकंडीतून बाहेर पडली नि वर बघून जनीला पुकारलं. मधेच कपडे धुणाऱ्या लैलालाही आवाज दिला.

‘ए लैला, तूबी काम करके इदरीच बैठ मेरी बेटीके साथ.’

‘हां चाची. पर वो बच्चा टिव्ही देखने देगा क्या? मेरेकू वो शादीवाला सिरिअल देखना है.’ लैला.

‘हा. तुम दोनों मिलके टिव्ही देखना. और मेरे बच्चेकोबी.’शिडी उतरताना जनीपण तिला बोलली.

‘ऐकती का ग टवळे? तुमी दोगीबी बसा वर. खाली टेलर ध्यान ठयेईल.’

सीताबायने आपल्या मुलीला सांगितलं, एवढयात वरच्या अंगाने एक माणूस चारपाच बाया नि आठदहा पोरं घेऊन आला. पोरांच्या हातात एक ‘झोपडी बचाओ’ चा लांबलचक बॅनर होता. ती पोरं चालताना जवळ आली कि ती अक्षरं दिसेनाशी व्हायची. मग तो संजय दुधाणे नांवाच्या नगरसेवकाने पाठवलेला माणूस त्या पोरांवर खेकसायचा. बायांच्या हातात भगवी निशाणं. पार्टीची.

आता मैत्रिणी झालेल्या ह्या दोघी तयार असल्यासारख्या त्याला सामोरं आल्या.

‘आता कुडं जायाचं ओ भाऊ?’

‘अगोदर वस्तीच्या भाएर तर चला. आन् तुम्हालापण झेंडा घ्यावा लागेल.’

काळी सीताबाय पुढे सरसावली. तशी त्याने तिला मागे सारून झेंडा जनीच्या हातात दिला. जरा उजळ असलेली नि झुळझुळीत साडी नेसलेली जनी जरा बरी दिसत होती. तिला पुढे व्हायला सांगून त्याने घोषणा दिली,

‘आवाज कुणाचा? ’ मागच्या पोरांनी त्याला प्रतिसाद दिला नि तो मोजून दहापंधरा जणांचा मोर्चा निघाला!

सीताबाईची पोर जनीच्या पोराला कडेवर घेऊन शिडीच्या वरच्या दारात उभी होती; तिच्या शेटानीने दिलेलं केळं त्या पोराला भरवत! कपडे धुवायचे टाकून खालून लैला तिला कायतरी विचारत होती! खाली दाराशी आलेला जुम्मन त्या दोघी बायांकडे पहातच रहायला!

आपल्याला मागे सारून जनीला झेंडा दिला म्हणून जरा खट्टू झालेली सीताबायही मग घोषणा द्यायला लागली. वडापाव केव्हां मिळतो ह्याची वाट बघत. मग तो दहापंधराजणांचा मोर्चा (? ) गल्लीच्या तोंडाशी असलेल्या चक्कीजवळ पोहोचतोय् तोवरच वाळत घालायसाठी मिरच्यांचं बोचकं घेऊन शेवताबाय् आली नि भाभीला म्हणाली ,

‘इतनी जल्दी गया क्या वो लोग?’

‘हां बाय. मोर्चा बोले तो उनका भांडन खतम. कितना झगडा करती दोनों. देखा ना.’

‘हां. तब्बीच मै बोली कि मेरा मिर्ची सुखानेको डालती पत्रेपर तो बहाना क्यूँ करती थी.’

‘अब नही करेगी. उनका भांडन खतम हो गया ना. जा. जाके तेरा मिर्ची डाल उप्पर| लेकिन अबके कोई नया झगडा न लाए दोनों तो अच्छा.’

शेवताबाई मग बाजूच्या छपरावरनं जनीच्या छतावर गेली मिरच्या वाळत घालायला!..

अजूनही आपल्या दारातनं मोर्चा गेल्या दिशेकडे बघणारी फरानाभाभी सीताबायच्या माघारी पण तिलाच उद्देशून मनातल्या मनात म्हणाली,

‘अब झंडी नही दी करके वापस झगडा मत करो.’

ती असं म्हणतेय् तोवर पाठीमागच्या कारखान्यांच्या बाजूने तिला दुपारच्या नमाजाची बांग ऐकू आली. ‘सच है.’ असं मनाशी म्हणत ती आत गेली, त्या दोघींसाठी दुवा मागायला!!

****

# मुन्नू

त्या छोट्याशा एकखणी स्वयंपाकघराच्या छोट्या खिडकीतून एवढा वेळ गरम वाऱ्याचा झोत येत होता नि आता अचानक चष्म्यावर पाण्याचे शिंतोडे उडाले तशी उजव्या खांद्यावरच्या पदराने डोक्यावरचे पिकून पांढरे झालेले केस झाकून घेत अम्मा मागच्या बाजूचं पत्र्याचं दार उघडून बाहेर डोकावली तो मुन्नू पाईपाने खाली उतरत्या पत्र्याच्या छपरावर पाणी मारत होती..तिला बहुतेक तिच्या मांने भांड्यांवर पाणी घालायला सांगितलं असावं. आणि आपण गेली झोपून. पोर काय करतेय हे बघण्याएवढी अक्कल नि सवड दोन्ही नसावं तिच्याकडे.

'अरे मुन्नू..तेरी अकल गई घास खाने..गरम पत्रेपे पानी डालेगी तो अंदर और गरम नही होगा क्या..? और हमारे पत्रेपे अनाज सुखाने रख्खा है वोभी गिला कर देंगी...ठेर अब आती हूं मै.. अम्मा किधर है तेरी.? सोई होगी महारानी..'

तिला घाबरून मुन्नू म्हणजे मुमताज पाईप टाकून घरात पळाली.गडबडीत भिजलेला फ्रोकसारख्या घागऱ्याचा लांब शेव पिळायचंही ती विसरली. ती दादीला घाबरायची बहुतेक.

'अरी कलमुई..पानी तो बंद करती जा...टाकी खतम हो जावे तो सिसोटी वालोंसे पानीकी भीख मांगनी पडेगी.'

ही म्हातारी अशीच कोकलत राह्यली तर जागी झालेल्या अम्माचा मार पडेल म्हणून मुन्नू पुढच्या बाजूला पळाली.

'.अरी मेहरू जरा भार तो आ और अपने लाडलीका कर्तुत देख..इस्कूल नही भेजेगी तो यही सब करती रहेगी...सिलाई बुनाई छोड, ठीकसे रोटियां सेंकने तो सिखा देती.. सिरफ़.धूपमे लडकोंके साथ गिल्लीडंडा खेलती रहेगी बस्स. छिचोरी कहींकी..खुद करती नही तो बेटीको क्या खाक सिखाएगी.. उसे सालभरमें बुरखा पेहनना पडेगा. यह गलीके लडके, तोबा तोबा..अल्ला शुकर करे..'

म्हातारीच्या तोंडाचा पट्टा कानांवर पडूनसुद्धा आतल्या खोलीत दुपारची सुस्तावून आडवी झालेली मुमताजची अम्मा ;मेहरुन्निसा बाहेर डोकावलीसुद्धा नाही..म्हातारी मग चडफ़डत स्वत:शीच बडबडत आपल्या घरात शिरली...

'क्या समझाएं इस गंवार औरतको; बेटीको अपनेजेसा बनाएगी..इधर पानी बेकार जा रहा है और बेगमसाहिबा सो रही है. खाविंद किधर दुबायमें मजदूरी करके पेसा भेजेगा और ये रानी साहिबा सोती रहेगी..कभी इस बूढी सांसको एक निवाला नही दिया... हसन बम्बईसे पेसा भेजता रहा इसलिये जिंदा हूं..और एक वो है ; झीनत..बेचारी कितना काम करके घर सम्हालती है..वहांभी और अब यहांभी! '

म्हातारीच्या डोक्यात चक्र सुरू झालं..

' दोन्ही माझ्याच सुना..एक ऐदी नि दुसरी संसार रेटून नेतेय..अच्छा हुवा, हसनने उसे पहलेही छोडा. ही काय त्याचा संसार करणार होती. कुछ कामकी नही थी.पण माझाच भाचा निकाह करून तिला घेऊन आला तेही माझ्याच

शेजाराला..तलाकशुदा औरत, बेठके खाएगी. हसनने मेहेरका पेसा दिया कर्जा निकालके. उप्परसे ये मुन्नू मेरेही गलेमें पडी, दादी बोलके..'

झीनत हसनबरोबर मुंबईहून पळून आली तेव्हां ती 'पेटसे' होती. बिच्चारी!.' ....

पुढच्या खोलीत शिरतांना तिचं लक्ष गेलं झीनत कायतरी बोचकं बांधत होती.

'अरी बहूरानी..अभी संवर क्यूं रही हो? इतनी धूपमे कहां जाओगी? '

'ऑर्डर पहुंचानी है और लेनी भी है..वो भी दुकान वालोंसे..अम्मा..जाना तो पडेगाही..

'तो शामको जाओ ना, कोन मना कर रहा है..?

'शामको बच्चे लोटेंगे स्कूलसे. छोटूका तो ठीक है, मगर बडेवालेको पढानाभी है..टाईम

कहां है अम्मा? और वो मुन्नूकोभी..'

' उसे छोड.. अब बडेवालेको वो किलासमे डाल दो ना.....'

'अगले साल डालनाच पडेगा..उसके लिये्भी रुपया इकट्ठा कर रही हूं..आठवी खतम करेगा ना..और इनकी हालतततो देखती है आप.. सायकिलरिक्षा चलाते पेर दुखने लगते होंगे उनके....''

'वो तो है..कब जाकर वो बेन्कवालोंसे कर्जा मिलेगा और कब वो स्कूटर रिक्षा लाएगा..'

" मेरा कुछ जुगाड होवे तो कर्जा लेंगे बॅन्कसे..तबतक तो संभालनाही पडेगा ना. थक जाते है वोभी..उपरसे बच्चोंका हंगामा.. वो मुन्नूकाभी कुछ करना पडेगा..'

"नाम मत ले उस छिचोरी लडकीका..और मै किसलिये हूं? मै संभाल लूंगी ,..धूप उतर जाए फ़िर चली जाना..'

'मुन्नूको क्यूं डांट रही थी आप? उसने क्या किया अब?'

'छतपे पानी डाल रही थी..'

'इसलिये आप चिल्ला रही थी? '

'फ़िर? आए दिन कुछ करती है..'

'है तो आपहीकी पोती! '

'उसका वो बाप है ना..कमबखत उसे यहां छोड गया. मा नही के बराबर..'

'अम्मा ,छोडिये उसे.. मैने मेकॅनिकको बुलाया है शामसे पहले..वो चॉबेजीका बेटा, जिससे मशिन खरीदी थी..'

'आए दिन बुनाई की मशिन बिगडती है तेरी..'

'लेकिन मरम्मत तो करनीही पडेगी ना..रोजीरोटीका सवाल है..और अब जाडेका मॉसम सामने है, तो स्वेटर-मफ़लरकी औंर्डर तो होगीही..ना..'

'वो सब तो होता रहेगा बेटी., एक दिनसे क्या फ़र्क पडेगा?

'तब तो देर हो जाएंगी..ऍसेभी हो गई है.पॅसे मिल जाएंगे तो कल राशनभी भर दूंगी ना.

और अगली औंर्डरभी पूछ लेनी है..'

’आता ह्या म्हातारीला काय सांगावं आपण का जातोय ते..उद्याचं जेवण येणाऱ्या पेशांवर आहे. पीठमीठ आणायचंय..पोरांसाठी बटरखारी तरी हवीतच ना..मधेच ती शेजारची पोर येऊन डोकावते..अब्बू नाहीतर छोटी अम्मी म्हणत येते..कांहीतर द्यावच लागतं..आपल्याला सावत्र बापाचा अनुभव आहेच..हिचा निदान पेसे तरी पाठवतोय..अम्मा वेडसर..लक्ष ठेवायलाच हवं नाहीतर अजून एक झीनत पळून जाईल घरातून..संध्याकाळी रिक्षा ओढून दमलेला नवरा घरी आला तर जे पेसे हातांवर ठेवील ते कसे पुरणार पाच माणसांच्या कुटुंबाला..जाऊ दे..नशीब आपलं..आपणच ओढवून घेतलेलं.’

हातांनी बॉक्समधे स्वेटर नेटकेपणाने लावून ठेवता ठेवता तिचे विचार चालूच होते....

मुंबईत मीरारोडला लाल टिळा लावणाऱ्या लंबे रिक्षावाल्याच्या धन्याची दुसरी रिक्षा चालवणारा हसन तिला भेटला नि ह्याच स्वेटरच्या डिलिव्हरी पोहोचवतांना ती त्याच्या प्रेमात पडली. तो विवाहित आहे हे माहित असूनही..त्याची वेडसर नि आळशी बायको गांवाकडे आहे नि त्याला एक मुलगीही आहे हे समजूनही झीनत हसनच्या प्रेमात पडली. म्हणजे अक्षरश: पडली. स्वत:ला वाचवायसाठी,.कारण त्यावेळी तरी दुसरा इलाजच नव्हता...

बाप गेला नि आठवी पास झाल्यावर शाळा सोडून आईने ठेवलेल्या दुसऱ्या नवऱ्याच्या अनौरस मुलांना संभाळत घरी बसावं लागलं होतं..त्यातनं सुटायसाठी हे काम घरी करायला आणलं नि त्या माणसाने मशीनच बाजारात नेऊन विकलं..तेव्हांच हा हसन मदतीला आला..

तो आपलं कुटुंब गांवाला सोडून आलाय हे माहित असूनही ती त्याच्यासाठी वेडी झाली. प्रेमाची मजा वगैरे असलं कांही कळायएवढी समज नव्हती..होता तो थोडा सुरक्षिततेचा विचार..त्या हैवान सावत्र बापापासून वाचण्यासाठी..!

हसनच्या मदतीने त्याच्याच खोलीवर काम सुरू ठेवलं नि मग सुरू झाला संसार.. तो सुरूही झाला नि सांवरला तो त्या भगव्या झंडीवाल्या लंबे रिक्षावाल्यामुळे.! त्याच्या धन्याच्या दोनातली एक रिक्षा हसन चालवत होता. लंबे होताच जोडीला..

सगळं माहित असूनही हसनबरोबर आलेल्या तिला लंबेने गपचूप नालासोपाऱ्याला नेऊन ठेवलं..दोघंही सद्न्यान होते तरी पुढे काय वाढून ठेवलंय ह्या काळजीतच होते..पण रिक्षावाला धनी चांगला माणूस निघाला.. त्याने लंबेबरोबर दोघांनाही वान्द्र्याला वकिलाकडे नेऊन त्यांचं रजिस्टर्ड लग्न लावून दिलं, स्वत: साक्षिदार होऊन! तिने त्या लंबेला आधी पाह्यलंही नव्हतं आणि त्याला कांही राखी वगैरे नव्हती बांधली तरीही...त्याच्या बायकोने चार भांडीकुंडी दिली आणि लंबेच्या खोलीच्या वरच्या माळ्यावर पत्र्याच्या खोलीत हसनचा संसार सुरू झाला..

'अरी झीनत, लई आवाज नको करू तुझ्या मशिनीचा. माझं लेकरू झोपलंय बाई.'

'अच्छा भाबी.'

'आन माझ्या टिपात पाईप टाकलाय..झालं का तूबी तुजंवालं भरून घे.पाणी कवा जाईल काय पता....'

हा असलाच संसार! पण त्या लंबेच्या तिथे असलेल्या धाकामुळे थोडं सुरक्षित वाटायचं..

तरीही तिथे धार्मिक रूढींच्या नि आपल्याच समाजाच्या धाकामुळे, आणि त्या बापाच्या वाईट नजरेपासून निभाव लागणं कठीण होतं...तो केव्हांही गुंड घेऊन आला असता.

’बाकायदा निकाह नही पढवाया तो ये रिश्ता कैसा..रंडी साली....’

ज्याने स्वत:च तिच्या अम्माला ठेवलं होतं तो.सावत्र बाप हात धुवून पाठी लागला होता.. त्याच्या संसाराला मिळणारे चार पैसे बंद झाले म्हणून..त्याची नजरही अंगाला बोचायची इतकी वाईट..आई फ़क्त नांवाला होती..शेजारची लोकं चिडवत तशी फ़क्त बिनकामाची नि बिनलग्नाची खटियारानी होती....

’अरे बिटियारानी..मेरी सून...धूपमे कहीं लु लग जाएंगी तो तेरी ऑड्डर चौपट हो जाएंगी ना.’

झीनतने नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष केलं..काम तर करावंच लागणार होतं..गाडा रेटणं एकट्या

हसनच्या कमाईवर शक्य नव्हतं..

’वहां शहरमें अच्छा चल रहा था, क्यूं आए तुमलोग इधर! ये वाली रिक्षा चलानेसे वो तीन

पैयावाली स्कूटररिक्षा चलाना बेहेतर था..बच्चेको बडा होते यहां भेज देते...’

’हां अगर हमे वहां कोई टिकने देता तब..सब हमारी जानके दुष्मन खडे थे चारों ओर...आगे चलकर घरबारका और बच्चोंका क्या होता? आप अकेली केसे संभाल पाती सब..’

’तुमलोग पेसे भेजते तो थे..’

’वहां मगर रहते कहां? इत्तेसे छोटे कमरेका किराया कितना देना पडता...न बिजली न पानी. सोचा यहां कुछ मदद मिल जाए...’ पुढे मग ती अचानक गप्पच झाली, हात चालूच होते..फ़क्त तोड बंद झालं..हसन आला कि निघायचं..बस्स...

म्हातारीला तिच्या बोलण्याचा रोख लक्षात आला.शेजारचा भाचा हसननेच सोडलेल्या मेहरूला संभाळत होता..कधी घरी आला तर मुन्नूला इकडेच पाठवून द्यायचा, त्या अर्धवट बायकोसाठी.. विचारपूस तर दूर..शिवाय म्हातारीचा दीर भोपाळ जवळ कुठल्यातरी दर्ग्यातला मुजावर होता.त्यांच्या घरात कोणी रिक्षा ओढणं म्हणजे कमीपणा होता. पण शेजारचा भाचा दुबईला जाऊन मजूरी करत होता ते कोणाला खुपलं नाही!

हसन पोटासाठी इंदुरात सायकल रिक्षा ओढत होता..हसनचे चुलतभाऊ ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करत होते. थोडाफ़ार जमिनजुमला बाळगून होते..त्यांनी संबंधच ठेवले नाहीत..विशेषत: हसन बुरखा न पाळणाऱ्या झीनतला घेऊन मुंबई सोडून इंदुरात परतला तेव्हांपासून.. त्यातून ती थोडंफ़ार शिकलेली नि स्वत:चा व्यवसाय करणारी..

तसं तर इथेही भोवतालच्या लोकांना ते खुपत होतं.पण ती कामाखेरीज घराबाहेर पडायची नाही..ऑर्डरी घ्यायला किंवा माल पोहोचवायला व्यवस्थित

डोकं झाकून हसनबरोबर जात असे..ठरल्या वेळी नमाज पढत होती..शिवाय दोन्ही मुलांना चांगल्या शाळेत घातलेलं.हे सर्व म्हातारीला नवीन होतं पण आवडत होतं..सून जिवाचा आटापिटा करून पेसे जोडतेय तेही आपल्या नवऱ्याच्या भल्यासाठी हे तिला कळत होतं..

'जल्दी चलो झीनत, मै रास्तेंमें दुकानपर सवारी छोड आया हूं...वापिस उठानी है.."

बाहेरून हसनने आवाज दिला...जेवायला आला तेव्हां सांगून गेलेला..लगबगीने ओढणीचा फ़ेरा घालून डोकं झाकत आपल्या दोन्ही हातात दोन मोठ्या केरीबेग उचलून ती निघाली..एका काखेत पर्स नि दुसरीत पाण्याची बाटली..

"मुझे मार्केटमे छोड देना फ़िर संवारीको उठाना.." सामान ठेवता ठेवता झीनत बोलली..

"अरे वहीं, मार्केटमेही छोडा है संवारीको..बुजूर्ग है. चल नही सकते..तुम चलो..." त्याचे पाय सराईतपणे सुरू झाले.

कुठून तरी उगवल्यासारखी मुन्नू आली..

' छोटी अम्मी मै आउं..?'

'अब तेरेको कहां ले जाऊं..?' हसन डाफ़रला..झीनतने त्या पोरीच्या डोक्यावर हात ठेवून मुका घेतला तशी तो अजून चिडला.

'अरे छोडो अभी वो सब..जल्दीसे बैठ जाओ...'

केरीबाग एका सिटवर टाकून ती जरा संकोचानेच बसली. मनातून तिला शरमल्यासारखं

वाटत होतं..नवरा जीव तोडून ओझं ओढतोय नि आपण? कधी पेसे साठणार, कधी बेन्क

लोन देणार नि कधी औटोरिक्षा घेणार? तोपर्यंत?

मागे राह्यलेल्या मुन्नूला हात हलवत तिचे विचार सुरू झाले..

’आता ह्या पोरीला तो बाप संभाळतोय का सोडून देतोय..का आपल्या त्या सावत्र बापा सारखाच ती वयात यायची वाट बघतोय....’

तिला सतत टोचणी असायची..हसनने आपल्यासाठीच तर नसेल सोडलं मेहरूला..पण तो तर

दोन वर्ष गांवी आलाच नाही..तेव्हांच....

शक्य आहे..म्हातारीला संभाळतांनाच जर त्याने मेहरूला...म्हणजे हे सर्व म्हातारीच्या संमतीने

झालं? कि हसनला खरंच ती आवडत नव्हती?

आपल्यामुळे तिचं नुकसान झालंय का ही टोचणी मग तिने बाजूला सारली..हसन तिकडे आपल्याजवळ नि ही इकडे..म्हातारीजवळ..त्यात तो कधीतरी आलेला भाचा..जमलं असेल..

मग हसनने तिला दिलेला तलाक? काय खरं काय खोटं समजत नव्हतं नि समजून घ्यायची

इच्छाही नव्हती होत..कारण गोष्टी घडून गेल्या..बिचारी मुन्नू ह्यात भरडली जात होती का?

आता ह्या पोरीची आपल्यासारखी अवस्था नाही होता कामा..!..

मार्केटमधली सवारी जाऊ नये म्हणून जिवाचा आटापिटा करत हसन पाय मारत होता..

वरून सूर्य आग ओकत होता नि डोक्याला बांधलेली गमछाची टापशी घामाने भिजली होती.

दम लागला असेल म्हणून आपल्या बॅगेतनं बाटली काढून झीनतने त्याला पाणी देऊ केलं.

डाव्या हाताने हैन्डल पकडून त्याने बाटली तोंडाला लावली इतक्यात चुकवलेल्या खड्ड्यातूनच

एक चाक उसळी मारून गेलं नि चेन सुटली..दोघांनाही चांगलाच दणका बसला..

तिलाही तहान लागलीच होती. तरी त्याच्या हातून पाण्याची बाटली घेण्याची संधीच मिळाली नाही..कलंडलेल्या रिक्षा मधनं ती बाजूला फ़ेकली गेली..आपल्याच चाकाखाली आलेला एक पाय ओढून हसन कसाबसा उभा राह्यला नि तिला आधार द्यायला गेला..तर ती स्वत:ला सांवरत लंगडत आपल्या बाहेर फ़ेकल्या गेलेल्या कॅरी बॅग उचलण्यासाठी वाकली नि तिच्या लक्षात आलं कि तिला कंबरेत जोरदार कळ आलीय....

चेन लावून झाल्यावर एकमेकांना धरून सांवरत मार्केटमधल्या दुकानात माल पोहोचवून दोघे

परतले..उशीर झाल्यामुळे ती बुढ्यांची सवारी गेलीच..परतीच्या प्रवासात हसन एक पाय ओढत रिक्षा ढकलत होता..

दारात रिक्षा थांबली तर शाळेच्याच कपड्यातली दोघं पोरं बघत राह्यली..

पण कुठूनशी मुन्नू आली नि माहिती असल्यागत छोटी अम्मीचा हात धरून घरात नेलं..

झीनत बघतच राह्यली..ह्या मस्तीखोर नि अवखळ पोरीला एवढी समज?

म्हातारी समोर आली तो हसनही लंगडतच होता..पोरगे सुन्न झाल्यासारखे आपापली दप्तरं जागेवर ठेवायला जाणार तो म्हातारी बोलली, ’मै न बोलती, इतनी धूपमें मत जाओ.’

’अम्मा धूपसे कुछ नही हुवा..सायकलचेन निकल गई..’

झीनतने पोरांना विचारलं, ’तुम लोग कॅसे आए?’

’अरी ये मुन्नू गई दोनोंको लेने..’ म्हातारीने सांगितलं एवढ्यात मुन्नू आतून पाणी घेऊन

आली..’ अब्बू लो पानी..मै आती तो मदद हो जाती ना छोटी अम्मी!’

झीनतला कौतुक वाटलं नि अचानक उरात दाटून आलं..तिला स्वत:चं बालपण नि कष्ट आठवले..तिने पोरांना जवळ घेतलं तसंच मुन्नूलाही घेतलं..हसन बघतच राह्यला..

इतक्यात म्हातारी बोलली,

' अरी पडोसमें वो मुस्तफ़ा लौटा है, कहता था बम्बईसे आया है.. मुन्नूको लेनेवास्ते..'

' अब दुबाय छूट गई क्या?' हसनने विचारलं..

' और मुन्नूको क्यूं ले जाएगा? ' हसनकडे पहात झीनत बोलली..

' कुछ रिश्तेकी बात करने..' म्हातारी..

'इतनी जल्दी? अब उसकी उम्रही क्या है! तू बम्बई जाएगी मुन्नू?'

'मुझे कहीं नही जाना..' छोटी अम्मीच्या दुखऱ्या कमरेला बिलगत मुन्नू बोलली.

'हां वो क्यूं जाएगी..वहां गिल्लीडंडा किससे खेलेंगी..' म्हातारी हसत बोलली.

झीनत एकदम सावध झाली..तिला हे रिश्ता प्रकरण माहित होतं..अरबांना कोवळ्या मुली

विकून पैसा कमवण्याचं साधन..अचानक ती बोलली..

'मै जानती हूं कहांसे रिश्ता आएगा! मुन्नू कहीं नही जाएगी..शादी तो दूर, उसे बम्बई भेजेंगेही नही..'

झीनतच्या डोळ्यांसमोर आपला भूतकाळ आला नि सावत्र बापाचा छळही!

'मै एक और झीनत नही होने दूंगी!' पक्का निर्धार केल्यागत ती बोलली..

'अरी पर उसकी अम्मा? ' कांहीच न समजल्यासारखा हसन बोलला.

’उसे इतनी समझ कहां है? और आप मुन्नूके बाप है ना. आप रिश्तेके लिये मना कर सकते हो...उसे पढने दो..मेरे दो बेटे है तो तिसरी बेटी भी पढेगी..’..म्हातारी नि हसन दोघेही झीनतच्या तोंडाकडे बघतच राह्यले..

अचानक जाग आल्यासारखी पुढे होऊन म्हातारीने झीनतची अलाबला घेतली..तिच्या डोळयात

पाणी आलं..हसनही भारावल्यासारखा बघत राह्यला.

थोडीफ़ार समज आलेली मुन्नू झीनतला बिलगली..तिला पोटाशी घेत झीनतने तिच्या कपाळाचा मुका घेतला नि म्हणाली..

’मुन्नू अब पढेंगी.. है ना मुन्नू..’

मुन्नूने नुसतीच मान हलवली..भरल्या डोळयांनी..!

*********

# रुकरुक

गाडी पकडायची म्हणजे पूर्वेला जावंच लागायचं. तेही लाईन क्रॉस करूनच. वाहनांसाठी फाटक होतं ते जरा लांब वरच्या अंगाला, मग वळसा घालायला नको म्हणून बहुतेक लोकं लाईन क्रॉस करूनच जायचे.

क्रॉस करून जाणाऱ्या बहुतेकांना दोन गोष्टी नेहमीच कानावर पडत.एक पूर्वेकडे उजवीकडल्या भिंतीला लागून असलेल्या साईबाबांच्या घुमटीवरच्या लहानशा घंटेची नाजूक किणकिण नि त्याच्या अगदी विरूद्ध म्हणजे घुमटीला लागूनच असलेल्या जुन्या इमारतीतल्या पहिल्या मजल्यावर खिडकीबाहेर टांगलेल्या पिंजऱ्यातल्या पोपटाचं कर्कश्श ओरडणं. थोडया थोडया वेळाने तो सारखा ‘रूक रूक’ असा आवाज काढायचा.

खरं तर त्या खिडकीत एक वयस्कर अम्माजी दिवसभर बसून असत. बहुतेक अपंग होत्या. नाकाची भोकं दिसतील इतक्या वर उचललेल्या नाकपुडयांवर दोहो बाजूला चमक्या घातलेल्या. दोन्ही शेव पुढे सोडलेली ओढणी. नमाजाची बांग ऐकल्यावर ती ओढणी जरा वर माथ्यावर सरकायची. आवाजही जरा भरडच. कर्कश्श नाही तरी पोपटासारखाच.

त्यांच्या उजव्या बाजूला रेल्वेलाईनचं एक विचित्र वळण होतं.तिकडून येणारी गाडी दिसायची नाही. त्यामुळे लाईन क्रॉस करू पहाणाऱ्या बहुतेकांना त्या थोडया थोडया वेळाने ‘रूक रूक.गाडी आ रहेली है ’ असं सांगून सावध

करायच्या. चांगलं काम करत होत्या. पण त्यांचं ऐकून तो पोपटही सारखं ‘रूक रूक’ म्हणायला लागला होता.

लोकांचाही नाईलाज होता. तसेच जाये करायचे. मधेच अम्माजी वरून त्यांच्या गल्लीतल्या कोणालातरी आवाज द्यायच्या.

‘देख मुश्ताक आगे जाके बडे रास्तेसे कुछ केले लेके आ. आज सामनेवाला कुछ अच्छा मटन नै दे रहा. सालन कैसे बनेगा?’

‘अच्छा अम्माजी.’ मुश्ताक म्हणायचा नि चालू पडायचा.मग मागून येणाऱ्या पुढल्या सोसायटीतल्या सिंधी महिलेला आठवण करून द्यायच्या.

‘क्या बिब्बीजी, आज साईबाबाको फूल नै चढाया. सिद्धा मटन लेने कैसे गई? ‘

‘नै. मेरी सर्वन्टको वो मटनवाला फँसाएगा न. पिछली बार खाली हड्डी दिया. इसवास्ते मेरेकोच आना पडा.’

बिब्बीजीची बांग्लादेशी सर्वन्ट बऱ्याचदा बाजार करायची. तिला माशातलं समजायचं पण मटणाचं कांही जमायचं नाही.

दुपारी ठराविक वेळी तिथून खांद्यावर हातोडा घेऊन नुसत्या बनियनवर जाणारा लाईनमनही दिसायचा. कपाळी अबीराचा टिळा नि डोक्याला पांढरी टोपी असा नेहमीच्या अवतारातला माणूस दिसला तर अम्माजी त्याचीही चौकशी करायच्या. त्याला लोकं बुवा म्हणायचे.

‘क्या बुवा, चायबाय पिया कि नै?’

‘नै. अब आगे ठेसनपे जाके पिएगा.’

बुवा पुढे निघून गेल्यावर अम्माजी दुसरं गिऱ्हाईक बघत रहायच्या. त्यांना सतत बोलत रहाण्याचा सोसच. मग कुणीही चालायचं. अगदीच कुणी नसलं तरी पोपट होताच.

‘कितना मिरची खाया सुबासे. गरमी होगी.’

‘रूक रूक.’ पोपट उत्तर द्यायचा!

‘अरी सकिना पानी नै रख्खा पिंजरेमे? ’ आत बघत त्या मग सुनेला आवाज द्यायच्या. असं हे दिवसभर चालायचं....

तसा तिथे एक जुना गंजलेला फूटओव्हर ब्रीज होता. पण त्याचा फारसा उपयोग कोणी करायचं नाही. गल्लीच्या तोंडाशी रेल्वेची भिंत चक्क फोडून वाट केलेली. लोकांनी, विशेषत: पूर्वेकडच्या भिंतीला लागून जी पालं होती त्यातल्या लोकांनी जाये करण्याची सोय केलेली. अलिकडच्या भिंतीला लागून असलेल्या टपरीवाल्यांची गिऱ्हाईकंही त्यात होती. कारण पूर्वेला त्या पालांपलिकडे नि अम्माजींच्या इमारतीपलिकडेही जुन्या भाडयाच्या कांही इमारतींची मध्यमवर्गीयांची नि तुरळक नवीन होणाऱ्या सोसायटयांमधली थोडी नवश्रीमतांचीही वस्ती होतीच. त्या जागी पूर्वी केव्हांतरी एखादा अपघात झाला असेल तरी वर्दळ कायम असायची. मधेच लॅन्डिग असावं तशी भिंतीला लागून पलिकडे ती साईबाबांची घुमटी बांधलेली. तिच्या समोरची गल्ली थेट पूर्वेकडच्या मोठया रस्त्याला मिळालेली. डावीकडे अजून पक्क्या झोपडया

नव्हत्या तरी पालांची लाईन होतीच. बरेचसे फेरीवाले नि अलिकडचे टपरीवालेही रहात.

ओसाड पडलेल्या त्या फूटओव्हर ब्रीजच्या जिन्याखाली जवळपासच्या लोकांनी घरदुरूस्ती झाल्यावर रेबिडचा ढीग केला होता. त्याचाही उपयोग झाला पण वेगळया कारणाने. ब्रीजच्या उतरत्या जिन्याखालचं रेबिड सपाट करून एका खाटकाने आपली कापाकापीची सोय केलेली. पिलरच्या आडव्या पट्टयांनाच टांगून बकरे सोलले जायच. ट्रॅकवरून जाणाऱ्या किंवा पास होणाऱ्या गाडीतल्या लोकांना पुलाखाली सोललं जाणारं जनावर दिसायचं. मिटल्या डोळयांच मुंडकं बाजूलाच पडलेलं. क्वचित् एखादा नुकताच कापलेला जीव खाली पाय झाडताना दिसायचा. मंगळवार गुरूवार सोडून ताज्या मटणासाठी बहुतेक लाईन असायची. विशेषत: रविवारी गर्दी असायचीच. अम्माजीना नेहमी हे दृष्य दिसायचंच.

लाईन क्रॉस करणाऱ्यांच्या पायाखाली कधीतरी बकऱ्याचा कापलेला कान नाहीतर खूर असलं कायतरी यायचं! मात्र कावळयांची नजर पडली नसेल तरच! भटकी कुत्री घोटाळायची. रांगेतली कॅथलिक बाई येताना शिळा पाव घेऊन यायची! त्याना घालायसाठीच. चुकून एखादं उडालेलं हाडूक मिळालंच तर त्यांची झोंबी व्हायचीच. कधीतरी तीही रेल्वे लाईनवरनं पलिकडे पळायची. ती गाडीखाली येतील म्हणूनही अम्माजींचा जीव कळवळायचा. मग वरनं सांगायच्या.

‘देखो बिब्बीजी, वो मड्डमको बोलो कुत्ताको आदत मत डालो.’

‘क्यों अम्माजी? अच्छाही करती वो.’ बिब्बीजी स्वत:ही येताना शिळं अन्न घेऊन यायची. पालांमधल्या पोरांना द्यायला. अम्माजींचा इरफानही रात्री कुत्र्यांना रोटी घालायचा. बिब्बीजीला कळेना अम्माजीचा विरोध कशाला.

‘भागते भागते वो गाडीके नीचे आएगा ना. जानवरकीभी जान है भै.’

ती मार्था मग समजायची. म्हणायची,

‘अबी हम समझ गया. हम उदरका कुत्ताकोच डालेंगा. सबको गॉडही बनाया ना.’....

रेल्वेचंच गोडाऊनसारखं कांहीतरी लागूनच असल्यामुळे अलिकडे पुलाला लागून वस्ती अशी नव्हती. त्यामुळे फारशी वर्दळ नसायचीच. मटणवाल्यांचं काम बिनधास्त चालायचं. जवळपासच्या लोकांचीही सोय झालेली. गल्लीच्या टोकाला भिंतीच्या भगदाडाजवळच बाकडं टाकून विक्रेता माणूस समोरच्याला मटण द्यायचा. तिथल्या लाईनमधे सगळयांचीच मंडळी असायची विशेषत: रविवारची गर्दी पहात रहाणं हाही अम्माजींचा विरंगुळा होता. डोकं झाकून ओढणी दोन्ही कानांमागे खोचलेली अम्माजींची सून खिडकीबाहेर कपडे वाळत घालायला आली तरच त्यांची खुर्ची बाजूला केली जायची.

मग पुन्हा जाणाऱ्या येणाऱ्या गाडयांकडे नि लाईन क्रॉस करणाऱ्यांकडे पहात टाईम पास सुरू. विशेषत: संध्याकाळी परतून पूर्वेकडे जाणारे ओ्ळखीचे चेहरे दिसले कि हटकून बोलायच्य. ते माणूसही मग घुमटीजवळ थांबून वर बघत कांहीतरी बोलायचंच.....

‘क्या गंगाबाय् , आज देरसे आई कामपरसे? अरी, रूक रूक. गाडी जाने दे.’

पाठोपाठ पोपटाचाही संवयीचा आवाज आला. ‘रूक रूक.’

पालांमधल्या पहिल्या दुसऱ्या पालातच रहाणाऱ्या नि दारूडया नवऱ्याचा मार खाणाऱ्या गंगाबाईला अम्माजींची विशेष सहानुभूति मिळायची. प्रश्न ऐकूनसुद्धा गंगाबाईला उत्तर देता आलं नाही. मधेच अम्माजीच्या बाजूच्या ट्रॅकवरून धडधड करत गाडी पास झाली. मग क्रॉस करता करता वर बघत गंगाबाईने उत्तर दिलं.

‘हां अम्माजी. क्या करती? मेरी सेठानीका मेहमान लोग आया तो देर हो गई.’

‘और हाथमे क्या लाई? बाजार तो अब उठ गया होंगा ना.’

‘बाजार लानेको पैसा किदर है? वो मुर्दा सब लेके गया कल.’

‘तो तू देती कायको उसे?’

आदल्या रात्रीच धत्तींग करून तिचा नवरा पैसे घेऊन गेला. तेव्हां मार चुकवायसाठी साईबाबांच्या घुमटीजवळच येऊन बसलेल्या तिला अम्माजीनी पाह्यलं होतं.

‘कल देखा नै इदरतक मेरा पिछा करता आया था मारनेकू?’ साईबाबांच्या घुमटी जवळ नमस्कार करून वर बघत गंगा बोलली.

‘बच्चेके वास्ते कुछ लाई क्या? मै पाव भेज दूँ? ‘

‘नै. सेठानीने बचा हुआ पुलाव दिया आज. कलका देखा जाएगा’ ती हातातलं पार्सल दाखवायची.

गंगाबाय आपल्या पालाकडे वळली तरी अम्माजी अंधारातच तिच्याकडे पहात राह्यल्या नि मग खिडकीतनं दूर झाल्या.

त्याच रात्री उशिरा परतणाऱ्या कुणालातरी थांबत थांबत स्लो झालेल्या गाडीचा धक्का लागला. अलिकडच्या टपरीवाल्यांपैकीच कुणीतरी असावा. अम्माजींची खिडकी बंद होती नि पिंजऱ्याभोवती नेहमीप्रमाणे कपडा असणार. पोपटही मग झोपला असावा. कोणालाच जाग नव्हती. बाजूला कोलमडल्यामुळे त्या इसमाला फारसं लागलं नव्हतं. जोडीवाल्याने त्याला दवाखान्यात पट्टी मारून घरी नेला. त्याच लाईनमधल्या एका पालात.

सकाळी क्रॉस करणाऱ्यांपैकी कुणीतरी दुसऱ्याला ती जागा दाखवत होता.वरनं अम्माजीनी ऐकलं.

‘क्या हुआ भाई? कोई गिरा क्या गाडीसे? ‘

‘नै अम्माजी. अपने वो पानबिडीके ठेलेवालेको धक्का लगा. इदरीच गिरा था रातको.’

‘हाय अल्ला. मै कैसे सो गई.और ये तोताबी कुछ बोला नै. क्या हुआ उसको?’

‘कुछ नै अम्माजी. वो ठीक है.’

‘शुकर है. अल्ला रहम करे बेचारेपर.’

सगळया जाणाऱ्यायेणाऱ्यांची जबाबदारी अल्लाने जणू त्यांच्यावरच सोपवली होती!

त्या माणसाच्या आठवणीने व्याकूळ होत अम्माजींचा तो दिवस सरला. संध्याकाळनंतर अशीच समोर ट्रॅकवर गाडी स्लो होत थांबली. बहुतेक पुढे स्टेशनात गाडी उभी असणार. पलिकडच्या टपरीच्या लाईटमधे समोरच्या डब्याच्या रिकाम्या दारातनं टयूशनहून परतणारा त्यांचा नातू इरफान त्यांना दिसला. आधीच त्या माणसाच्या काळजीने बेजार झालेल्या. तशात नातवालाच समोर बघून खिडकितनं जीव खाऊन अम्माजी ओरडल्या.

'रूक रूक. इरफान, गाडी जाने दे बेटा. फिर आ.'

गाडीतली लोकंही बघायला लागली. इरफानला लाजल्यासारखं झालं. तो तसाच उभा राह्यला. गाडी हळूहळू पुढे गेल्यावर तो क्रॉस करून आला नि वर बघत चिडक्या चेहऱ्याने म्हणाला, 'दादीजान, आप सबको क्या बोलती - रहेती है? गाडी दिखती नै क्या.'

'हां बेटा. लेकिन डर तो लगताच ना.'

रोज रात्री नातू घरी आल्यावरच अम्माजी खिडकीतनं दूर व्हायच्या. तरीही एकदा घोटाळा झालाच. नवऱ्याच्या दारू पिण्याला नि माराला कंटाळलेली गंगाबाई नेमकी रात्रीच्या वेळी आपल्याच तंद्रीत मशेरीची तंबाखू न्यायला अलिकडच्या टपरीकडे येत असताना तिचा अपघात झाला.अम्माजी खिडकीतनं जरा बाजूला झाल्या असतील. एवढयात ओरडा झाला. उजव्या वळणावरनं येणारी गाडी बहुतेक तिला दिसली नसावी. झालं असं कि ती पटरी पार करून पुढे गेल्यावर तिला गाडीचा धक्का लागून ती कोलमडली नि तिचा एक पाय रूळांवर आला. गाडी लगेच थांबली.

थोडया वेळातच सगळे सोपस्कार झाले. गार्ड आला. शिटया वाजवत रेल्वे पोलिस आले. पुढच्या स्टेशनवरनं स्ट्रेचर आलं , ते नेमकं ओरडा ऐकून परत खिडकीशी आलेल्या अम्माजींच्या घरासमोरच. माणसं पाय तुटलेल्या बेशुद्ध गंगाबाईला घेऊन गेली ते अम्माजींनी पाहयलं नि त्या घटनेचा त्यांनी शॉक घेतला.

‘अल्लाह, ये क्या हो गया? जान देने निकली थी क्या उस माटीमिलेके वास्ते? बचा लो उसे. बच्चे भूखे रह जाएंगे बेचारीके.’ एवढंच बोलून एकदम गप्प झाल्या. पुढे मग बराच वेळ त्या कांही बोलूच शकत नव्हत्या, शब्द अडखळल्यासारखे यायला लागले.

त्यांच प्रेशर एकदम शूट झालं. ते लक्षात आल्यावर मुलाने त्यांना डॉक्टरकडे नेलं. पण त्या सुन्न झाल्यागत झाल्या! उपचार चालू होते, प्रेशर नॉर्मल झालं तरीही.

त्या घटनेनंतर गंगाबायच्या मुलांच्या काळजीने त्या बेचैनच असत. फारशा खिडकीत बसत नसत. सकाळी मटणाच्या लाईनमधल्यांना मग चुकल्यासारखं वाटायचं.

‘काय झालं ग अम्माजीला? आता खिडकीत दिसत नाय्.’

‘आजारी आसल. आवाज नाय दिला चार रोजात कुणालाबी.’

शेटलोकांसाठी मटन न्यायला आलेल्या कामवाल्यांची चर्चा सुरू झाली.

‘नय रे. वो उदरका गंगाबायका ऐक्सिडेन्ट हुआ. उसका पाव टूटा ना वो अम्माने देखा लगताय्. उससेच वो बिमार पडा होयंगा.’ मार्थाने मग माहिती पुरवली.

‘कोन गंगाबाय? तुमको कोन बोला?’

‘हमको वो कौलनीवाला बिब्बीजी बोला. वो कबी खाना लाके देताय् गंगाबायके बच्चेको. वो देखो आता है.’ मग मोर्चा बिब्बीजीकडे.

सगळयांना समजलं कि गंगाबायचा तुटका पाय कापावाच लागला नि त्या धक्कयाने अम्माजी जास्तच आजारी झाल्या.

……

घोटयाजवळ पाय तुटलेली गंगाबाय घरी आल्याचं त्यांना कळलं तेव्हां हायसं वाटलं.

पण आता त्यांचंच आजारपण सुरू झालेलं. प्रेशर खूपच चढल्यामुळे लकवा मारला. ऐटेक माईल्ड होता तरी त्यांची हालचाल कमी झाली. आधीच त्या पायांकडनं अपंग होत्या. आता तर आडव्याच झाल्या. त्यांचं बंद झालं असलं तरी शिकवल्याप्रमाणे पोपटाचं ‘रूक रूक’ मात्र सुरूच होतं. तेवढीच त्यांना तसल्ली…..

मागे जेव्हां शहरात दंगे झाले तेव्हां इथे फारसं कांही बिघडलं नव्हतं. मटनवाला सोडला तर बाकी सारे व्यवहार चालू होते. मात्र टपऱ्या वगैरे लवकर

बंद व्हायच्या. लोकं एकमेकांना संभाळायची नि शक्यतो घरीच थांबायची. पण सगळं सुरळीत कसं होणार. आधीची खुन्नस होतीच. त्यात ठिणगी पडली , म्हणजे ठरवूनच बाहेरच्या कोणीतरी टाकली.

ह्या मोहल्ल्यात कांहीच घडलं नव्हतं ह्याचं वैषम्य वाटणारा एखादा तरी विघ्नसंतोषी असणारच. त्यानेच कोणालातरी उठवून दिलं असणार. त्याला निमित्तही आयतंच मिळालं.

'इकडची' एक मुलगी बेपत्ता होती. तिला 'तिकडच्या' कोणाशीतरी बोलतांना लोकांनी पाह्यलं होतं. झालं. तेच निमित्त होऊन तणाव निर्माण झाला. त्याच माणसाने तिला पळवलं म्हणून 'इकडची' लोकं गोळा झाली नि टपरीवाले 'तिकडचे' म्हणून आधी टपऱ्यांवरच हल्लाबोल झाला. 'त्यांनी' कसंबसं सामान वाचवून घरी नेलं. त्यांचा पाठलाग करत 'इकडच्यांनी' रेल्वेरूळावरची खडी उचलून दगडफेक करायला सुरवात केली.

अम्माजींचं आधीच बंद झालेलं आणि आता तर पोपटाचंही 'रूक रूक' बंद झालं. त्यालाही अशुभाची चाहूल लागली कि काय कोण जाणे.

फारसं बोलू न शकणाऱ्या अम्माजीना बाहेरचा ओरडा नि शिव्यागाळी ऐकू आल्या. त्यानी इरफानला सांगून आपली खुर्ची सरकवून घेतली. तिथेच गडबड झाली. ओरडता येत नव्हतं तरी दगड फेकणाऱ्या बेफाम जमावाला त्या हातवारे करून नेहमीसारखं 'रूक रूक' म्हणून सांगायचा प्रयत्न करत होत्या. त्यातल्या कोणा माथेफिरूने पाठोपाठ दोनचार दगड त्यांच्याच दिशेने फेकले. त्यातला एक पिंजऱ्यावर आपटला तशी पोपट कर्कश्श स्वरात पण कळवल्यासारखा ओरडला. मात्र ते नेहमीचं 'रूक रूक' नव्हतं , सून मागे खेचत

होती तरी अम्माजींचे हातवारे चालूच होते. त्यातच मग दोन दगड त्यांना वर्मी लागले. एक डाव्या डोळयाच्या जरा वर लागला. डोळा वाचला असला तरी खोक पडलीच. दुसराही कपाळावरच मधोमध लागला नि रक्ताची धार लागली. अम्माजी कळवळल्या नि त्यांची शुद्ध हरपली....

पुढच्या स्टेशनवरून रेल्वे पोलिस येईपर्यंत जमाव पांगला तरी करायचं ते नुकसान करून गेला, रक्त तर बरंच गेलं. पण म्हणून नव्हे तर धक्क्याने अम्माजींचं प्रेशर शूट झाल्यामुळे त्यांना ऐडमिटच करावं लागलं. माईल्ड हार्ट ऐटेकही आला असावा. कोण जाणे कशा पण त्या बेशुद्धितच होत्या. शेवटपर्यंत!

नशीब एवढंच कि आठेक दिवसातच कारभार आटपला. त्यांच्या नशीबाने, त्यांनी कोणालाच त्यांना ‘रूक रूक’ म्हणायची संधी दिली नाही!....

अम्माजींची बॊडी हॊस्पिटलमधून घरी आणली ती नेमकी सका्ळची वे्ळ. शववाहिनी वाले स्ट्रेचर घेऊन वर गेले तेव्हां पलिकडे गर्दी झालीच. अगदी रडारड नाही तरी भोवतालची माणसं जमा झालीच. लाईन क्रॉस करून जाणारे नेहमीचे लोकही थांबून बघत राह्यले. सर्वांनाच बहुतेक त्यांचं ते संवयीचं ‘रूक रूक’ आठवत असावं. आता कुबडया घेऊन चालायला लागलेली गंगाबाई साईबाबांच्या ओटयावर येऊन बसली तेव्हां तिचेही डोळे भरून आले. समोरच्या रस्त्याने बिब्बीजी येताना दिसल्या.

‘बिब्बीजी आज नै हाय मटनवाला.’

'पता है. सोसायटीमे मच्छीवाला आके गया. वो बोलता था कि अम्माजीको लाया है, तो देखनेवास्ते आ गई.'

ओटयाच्या पलिकडेच कफन ठेवलेलं दिसलं नातलग जमा झालेले पण घरच्यांना बघायसाठी नि तयार करायसाठी बॉडी वर नेलेली.

'हमको देखनेको मिलेंगा क्या?' बाजूलाच असलेल्या पांढरी गोल टोपी घातलेल्या दाढीवाल्या वयस्कर गृहस्थाला बिब्बीजीनी विचारलं.

'हां. औरत लोग जा सकते है. लेकिन अब्बीच लाया है तो तय्यार करते होंगे.'

एवढयात अलिकडच्या बाजूने थोडाफार इतर बाजार करून परतणारी मार्था आज शेपटी हलवत समोर आलेल्या कुत्र्यांना टाळून पलिकडे गेली.आज मंगळवार का गुरूवार कोणाच्या लक्षात नव्हतं. मटणवाला मात्र आला नव्हता. गाडयांची येजा चालूच होती. पण सगळी माणसं जपून क्रॉस करत होती. 'रूक रूक' म्हणून इशारा करायला आता समोरच्या खिडकीत अम्माजी नव्हत्या. पोपटही उदासवाणाच झाला होता. अम्माजी हॉस्पिटलमधे असतांना त्याच्याकडे दुर्लक्ष झालं. इरफान त्याला खायला द्यायचा तरी तो खायचा नाही.

'बॉडी लाया क्या घरमे?' मार्थाचा अर्थवट गंगाबायला नि अर्थवट समोरच्या माणसांना असा प्रश्न.

'हां. वो क्या कफनबी तयार है.' गंगाबायच उत्तर देते.

'हमको देकनेका था. देंगा क्या? तुम चलता हमारा साथ? बादमें किदर मिलेंगा वो.'

'हम कैसा जा सकेंगा? इसवास्तेच इदर बैठा. लंबेसेच दुवा करेंगा.'

'हां मेन. वोईच कर सकता. लेट अस प्रे फ़ोर हर. देखने मिलता तो....'

'आप जाओ उप्पर. वो बिब्बीजीबी अब्बीच गई.' समोरचा माणूस बोलला.

हातातली पिशवी गंगाबायजवळ ओटयावर ठेवून मार्थापण वर गेली. अम्माजींची अशी कितीतरी चाहतेमंडळी बाहेर खोळंबली होती; मनोमन त्या दगड मारणाऱ्याला शिव्या देत.

मिनीटभर उभं राहून दोघी मग खाली आल्या. अम्माजींच्या सुनेला हात मिळवून. तिला काय बोलावं कळलं नाही. अशीच सगळी मंडळी बघून येत होती....

जनाजा निघाला तशी टपऱ्या बंद करून सगळे भराभरा जमले. डोक्याला रूमाल बांधून दर दोन पावलांवर खांदा बदलणारांची धांदल उडाली. अम्माजी शेवटच्या प्रवासाला गेल्या!....

दुसऱ्या दिवशी सगळे व्यवहार पूर्ववत् सुरू झाले. फक्त ते 'रूक रूक' सोडून. कारण गडबडीत खाणं देतांना इरफानच्या हातून पिंजऱ्याचं दार उघडं रहायल्यामुळे पोपटही उडून गेला होता! सगळयांना वाटलं कोंडलेल्या पंखात बळ नाही तर असेल जवळपासच नि येईल परत. पण कुठे दिसला नाही. जाणारे येणारे वर बघत होते. अम्माजींची खिडकी बंदच होती नि पिंजराही रिकामा.

दोन दिवसांनी बातमी कळल्यामुळे भिवंडी का कुठूनसा त्यांचा नातलग आला.

इरफानच्या अब्बाने त्याला कब्रस्तानात नेलं. मातीच्या ढिगावर जरीवाली काळी चादर नि सुकलेली फुलांची चादर दिसली. दोघंही गुडघ्यावर बसून दुवा मागत असतानाच आवाज आला| 'रूक रूक.'

इरफानच्या अब्बूला आश्र्चर्य वाटलं नि आनंदही. उडून गेलेला पोपट त्या कबरीवर बसून दोघांकडे पहात होता. थकलेला नि मलूल झालेला. हा इथे कब्रस्तानात कसा? नि बोलायचा बंद झालेला तो नेहमीसारखा 'रूक रूक' म्हणत होता. ह्यात काय संकेत असेल. तोच त्याचा मामूजान म्हणाला,

'वो तेरी अम्मीजानको रूकनेको बोलता. अगर दो दिन पहले बोलता तो....'

'नही मामूजान, अम्मीजान रूक नही सकती थी. उनको बुलावा आया था. मगर ये परिंदा कुछ और बोलना चाहता है. देखते है. वापस आएगाभी या नही...'

ते दोघे परत फिरले. पोपट कांही परतला नाही पण तो किस्सा मग पलिकडच्या त्या गल्लीभर झाला नि सगळेच चुटपुटले.

दिवस जात होते. आता कामाला जाऊ न शकणाऱ्या गंगाबायला तिचा नवराच कुबडया देऊन साईबाबांच्या ओटयावर भीक मागायला बसवतो. जाणारे येणारे एखादं नाणं टाकतात. अलिकडच्या मटणाच्या रांगेतला कुणीतरी तिला चहा पाजतो. नवरा मधेच दुपारी येऊन पैसे काढून नेतो. मुलं येऊन बिब्बीजींनी दिलेलं अन्न किंवा मार्थाने दिलेला पावही काढून नेतात. असहाय्य गंगाबायला साईबाबांच्या कृपेने मिळाला तर घास मिळतो. कधी सकिना इरफानच्या हातून कायतरी पाठवते. ती मग डोळयात पाणी आणून अम्माजींची

आठवण काढत बसते. तिला काळजी असते आता जवळ आलेल्या पावसाळयात कुठे बसणार नि भीक तरी कोण घालणार.

सुरवातीच्या सरी आल्या गेल्या अशाच होत्या. तरी प्लास्टिक पांघरून बसलेल्या गंगाबायचं अम्मांच्या आठवणीने वर लक्ष गेलं नि ती बघतच राह्यली. अम्माजींच्या बंद खिडकीबाहेर एक लहानसं पोपटाचं पिल्लू 'टिव टिव' आवाज करत साद घालत होतं. तिने खुरडत जाऊन इरफानला आवाज दिला. सकिना बाजूच्या खिडकीशी आली.

'देख बिब्बी,, अम्माजीका तोता वापस आया.'

'इतने दिनों बाद वो कहाँ आनेवाला. ये तो बच्चा है.' असं म्हणत तिने आतून कायतरी आणून खिडकीत ठेवलं. त्या पिल्लाने मग जुना संबंध असल्यासारखं ते खाल्लं.

ते मग संवयीने रोजच यायला लागलं. सकिनाही मग त्याला खायला द्यायला लागली. पाणी ठेवायला लागली. घरी असेल तेव्हां इरफानही त्याची वाट बघायचा. त्याने काढून टाकलेला पिंजरा उघडून ठेवला. त्यात जायला ते पिल्लू तयार नव्हतं. मात्र नेमाने येतच राह्यलं.

लहान होतं तरी इरफान त्याला बोलायला शिकवायचा प्रयत्न करायचा. त्याचं चार अक्षरी नांव 'इरफान' पोपट 'फान फान' असं उच्चारायचा. सलाम बोलायला सांगितलं तर 'लाम लाम' असं सगळं दोन अक्षरीच बोलायचा. एका सकाळी इरफानने सहज म्हणावं तसं 'रूक रूक' असं म्हटलं नि आश्र्चर्य म्हणजे दोन अक्षरी असल्यामुळेही असेल पण ते मात्र पोपटाने सही सही उचललं.. 'रूक रूक...'

वेळ सकाळची. लोकांची वर्दळ चालू झालेली.. आधी इरफान म्हणायचा तसं मग पोपटही म्हणायचा. ‘रूक रूक’ असा खेळ बराच वेळ चाललेला. खाली संवयीचे लोक जमा होऊन वर बघायला लागले. मधेच गाडया जात येत होत्या. पुढच्या स्टेशनवरची गाडी सुटलेली बघून इरफान जरा जोरातच बोलला. ‘रूक रूक’.

पोपटाने पण ते सहज उच्चारलं. ‘रूक रूक’

आश्चर्याने वर बघत लाईनमधून बाजूला होणारी लोकं मग आपसात बोलत पुढे निघाली| ‘अम्माजी वापस आई लगता. देखा सबकी कितनी फिकर है उनको.’

पुढे कांही दिवसांनी मोठं झालेल्या त्या पिल्लाची पिंजऱ्यात रितसर स्थापना झाली आणि सगळयांना त्याची संवयही. तिथे मग पूर्वीसारखंच थोडथोडया वेळाने ‘रूक रूक’ ऐकू यायला लागलं. वर अम्माजी नव्हत्या तरीही!!

# विजय खाडिलकर यांची इतर पुस्तके.

**कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल.**










